# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२,ई, शिवाजीगर,पुणे ४११ ०१६

☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com


जा. क्र. विकापु/लेखा-१/माहिती (इमारत)/२०१७/ 1672

दिनांक :- 02 MAY 2017

**तात्काळ**

प्रति,

सर्व प्राचार्य / संचालक,
शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी /पदवीका संस्था

विषय :- इमारत भाडे अनुदान मंजूर करण्याबाबत

संदर्भ : मा.संचालक,तंत्रशिक्षण मुंबई यांचे पत्र क्र ७/अनुदान/इमारत/२०१७/१२ दि.२४.०४.२०१७

कृपया उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे. आपल्या संस्थेतील इमारत बाबतची माहिती पत्रात नमूद केलेल्या तक्त्यात भरुन या कार्यालयास दिनांक ५.०५.२०१७ रोजी १२.०० वाजेपर्यंत actt1.ropune@gmail.com या संकेत स्थळावर पाठविण्यात यावी जेणे करुन पुढील कार्यवही करणे शक्य होईल.सदरची माहिती शासनास सादर करावयाची असल्याने विनाविलंब माहिती पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत: प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांकः १९६७, मुंबई :४०० ००१.

**दूरध्वनी- २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स नं.२२६९२१०२**

E_mail desk 7@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


का.क्र.७/अनुदान/इमारत/२०१७/१२

दिनांकः- 24 APR 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपुर

विषयः- इमारत भाडे अनुदान मंजूर करण्याबाबत.

संदर्भः- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.यांचे पत्र क्रमांक संकीर्ण -२०१३/(प्र.क्र.२१०/१३)/ तांशि-३,दि.२९/०३/२०१७

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते कीं, आपल्या विभागातर्गत येणा-या सर्व अशासकीय अनुदानित संस्थांच्या इमारत मालकीबाबतची नेमकी स्थिती काय आहे, व सदर संस्था एकाच परिसरात इमारतीत अन्य विना अनुदानित अभ्यासक्रम चालवितात किंवा कसे आणि त्यासाठी शिक्षणशुल्क समिती /प्राधिकरणाकडून त्यांनी इमारत भाडयाचा खर्च मान्य खर्चामध्ये समाविष्ट केला आहे किंवा कसे? या मुद्यांबाबतची माहिती या संचालनायास संचालनालयास सादर करावी. तसेच जर इमारत संस्थेच्या स्वतःच्या मालकीची असेल आणि भाडयाची नसेल,तसेच अनुदान नियमावलीनुसार परिरक्षण अनुदान मान्य करण्यात आले असेल अश्या संस्थेस इमारत भाडे अनुदान बंद करण्याबाबत आपले अभिप्राय देखील या संचालनालयास सादर करावेत असे संदर्भीय शासन पत्रान्वये माहीती सादर करणेबाबत कळविले आहे.(सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)आपल्या विभागांतर्गत अनुदानित संस्थांची खालील तक्यात माहीती प्राप्त करून एकत्रित माहीती त्वरीत संचालनालयास पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेच्या इमारत मालकी बाबतची नेमकी स्थिती (संस्थेची स्वतःची इमारत / भाडे तत्वावर घेतलेली इमारत) | संस्थेच्या परिसरात /इमारतीत अन्य विना अनुदानित अभ्यासक्रम राबविण्यात येतात का?असल्यास (अभ्यासक्रमाचे नाव व प्रवेशक्षमता) | शिक्षण शुल्क समिती /प्राधिकरणाकडून इमारत भाडयाचा खर्च विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या शुल्क आकारणीमध्ये समाविष्ट केला आहे का? |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

आवक क्र. 3573

(चंद्रशेखर ओक)भा.प्र.से.

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई

D/INSTITUTE LIST 90 % NEW